पुढारी

संक्षिप्त



संकेश्वर : पारंपरिक वेशभूषेत सहभागी विद्यार्थी.

## 'सायबर मास ॲक्टिव्हिटी'द्वारे जागृती

**संकेश्वर (पुढारी वृत्तसेवा) :** निडसोशी येथील एसएनजेपी पदवीपूर्व कॉलेज व क्विक हिल फाउंडेशनतर्फे निवड करण्यात आलेल्या सायबर वॉरियर्स विद्यार्थ्यांनी गौरी-गणेश सणानिमित्त पारंपरिक वेशभूषेत 'सायबर मास ॲक्टिव्हिटी' कार्यक्रम आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी प्रा. बसवराज हालभावी, तर प्रमुख पाहुणे म्हणून संकेश्वर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक राजू घस्ती उपस्थित होते. गौरी-गणेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांनी सायबरसंबंधित गीते सादर केली. सायबर सुरक्षा, डिजिटल फसवणूक, ऑनलाईन फसवणूक याबाबत समाजाला संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रा. शिल्पा पाटील, आनंद सोनार, पवन हिरेमठ यांचे मार्गदर्शन लाभले.